रस्ता सुरक्षा विषयक जन जागृती करणेसाठी NASSCOM यांचेमार्फत मोबाईल आधारित गेम बनविणे व स्पर्धेचे आयोजन करुन प्रथम तीन विकासकांना पारितोषिक देण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०८१७/प्र. क्र. १८९/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
तारीख: ०५ जानेवारी २०१८

वाचा-

१) अपर परिवहन आयुक्त यांचे क्र.पआ/का-११/संगणक/मोबाईल ॲप/२०१७-१८/ जा.क्र.७९४८ दि.२२/०५/२०१७ व दि.०२/०१/२०१८.

२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२ दि.१७/०४/२०१५.

प्रस्तावना-

रस्ते सुरक्षाविषयक जनजागृती करण्यासाठी मोबाईलवर आधारीत गेम बनविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून NASSCOM यांच्यामार्फत स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून प्रथम ३ विकासकांना पारितोषिक देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

रस्ता सुरक्षा जनजागृतीविषयक NASSCOM (National Association of Software and Service Companies) यांच्यामार्फत मोबाईल गेम बनविण्याच्या प्रस्तावाची व NASSCOM यांच्यासोबत करावयाच्या कराराचे प्रारुपाची, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून तपासणी केली असून प्रस्तावामध्ये Data Protection, IPR इ. सर्व महत्वाच्या मुद्दांचा समावेश असल्याने आणि प्रस्तावित उपक्रम हा रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने जनजागृतीविषयक असल्याने प्रस्तावास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सहमती दर्शविलेली आहे.

२. यास्तव रस्ता सुरक्षा जनजागृतीविषयक NASSCOM (National Association of Software and Service Companies) यांच्यामार्फत मोबाईल गेम बनविण्याच्या प्रस्तावास व NASSCOM यांच्यासोबत करावयाच्या कराराच्या प्रारुपास तसेच NASSCOM यांना द्यावयाचे व्यवस्थापन शुल्कापोटी रुपये २ लक्ष व प्रथम ०३ विकासकाना द्यावयाच्या पारितोषिकाची रक्कम अनुक्रमे प्रथम क्रमांक-रुपये ५ लक्ष, द्वितीय क्रमांक-रुपये ३ लक्ष व तृतीय क्रमांक-रुपये २ लक्ष असे एकूण रुपये १२,००,०००/- (रूपये बारा लक्ष फक्त) इतक्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत बाबीसाठी येणारा खर्च हा सन २०१७-१८ या वर्षाकरीता “मागणी क्र. बी-३, २०४१-वाहनांवरील कर (०१) (०४) कार्यालयीन अभिलेखांचे संगणकीकरण (मोटार वाहन), २०४१ ०२९७ (१३) कार्यालयीन खर्च-योजनांतर्गत” या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-२,अ.क्र. २७ अ, नियम क्रमांक ७६ नुसार नवीन संगणक यंत्रणा खरेदी करणे आणि/किंवा सध्या उपलब्ध असलेल्या संगणक यंत्रणेत वाढ/ई-गव्हर्नन्स यंत्रणा इ. त्याची श्रेणीवाढ करण्यास मंजूरी देणे तसेच त्यासाठी आवश्यक असणारे वातानुकूलित यंत्रणेची मांडणी व देखभाल दुरूस्तीसाठी प्रशासनिक विभागास अधिकार आहेत.

५. सदरहू शासन निर्णय हा माहिती व तंत्रज्ञान विभाग व माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी दिलेल्या सहमतीने आणि दि.१७.४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-२,अ.क्र. २७ अ, नियम क्रमांक ७६ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांतर्गत निर्गमीत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०५१३१४२०८४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df74927 03428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.01.05 13:17:58 +05'30'

(द. ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२
९. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय (साप्रवि-३९), मंत्रालय, मुंबई-३२
१०. उप सचिव, वित्त विभाग (व्यय-८), मंत्रालय, मुंबई-३२
११. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. निवडनस्ती, परि-४.